# पुणे महानगरपालिका

स्थायी समिती **(अंदाजपत्रक खास सभा)**

कार्यपत्रिका क्र.४८ सभा क्र.६७ दि.०४/०३/२०२५

पुणे महानगरपालिका स्थायी समितीची (अंदाजपत्रक खास) सभा शुक्रवार, दिनांक ०४/०३/२०२५ रोजी, सकाळी ११.३० (अकरा वाजून तीस मिनिट) वाजता, स्थायी समिती सभागृह २ रा मजला, पुणे महानगरपालिका भवन (नवीन इमारत), पुणे येथे संपन्न झाली.

**सदर सभेस पुढील मा.अधिकारी उपस्थित होते.**

**मा. डॉ.राजेन्द्र भोसले – प्रशासक तथा महापालिका आयुक्त, पुणे मनपा**

**मा. पृथ्वीराज बी.पी. – अति.महा.आयुक्त (इ)**

**मा.महेश पाटील – अति.महा.आयुक्त (ज)**

मा.नगरसचिव, सर्व मा.खातेप्रमुख, मा.उप आयुक्त तसेच प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

**नगरसचिव :** सभेला सुरूवात करण्यात येत आहे. स्थायी समिती खास सभा

**विषय क्र.१८५२**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम ९५ नुसार सन २०२५–२६ चे पुणे महानगरपालिकेचे महसूली–भांडवली इ.उत्पन्न व खर्चाचे अ व क अंदाजपत्रकाचा आराखडा सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. १७३१ दि.२०/२/२०२५ चे पत्र.**

**मा.प्रशासक :** पुणे महापालिका आणि महापालिका अधिनियमाच्या कलम ९५ नुसार महापालिका आयुक्त यांनी दरवर्षी उत्पन्न व खर्च याचा अंदाज तयार करून तो स्थायी समिती समोर सादर करणे अपेक्षित आहे. त्यानुसार या वर्षीचा म्हणजे २०२५–२६ चा उत्पन्न व खर्च याचा अंदाज तयार केलेला आहे. तो मी स्थायी समितीस सादर करतो.

स्थानिक स्वराज्य संस्था ही सामान्य नागरिक केंद्रस्थानी मानून नागरिकांना चांगल्या दर्जाच्या सेवासुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्नशील असते. प्रत्येक नागरिकास स्थानिक स्वराज्य संस्थेकडून प्रामुख्याने आरोग्य, स्वच्छता, पाणी, रस्ते, मलनिःसारण, दिवाबत्ती या सेवा प्राधान्याने मिळाव्यात अशी अपेक्षा असते. अंदाजपत्रक सादर करताना विद्यमान वित्तीय उपलब्धी व साधनसंपत्ती यांची कार्यक्षम सांगड घातलेली आहे आणि ही जबाबदारी ही प्रशासकीय यंत्रणेवर असते. मुलभूत सेवासुविधा देताना मुलभूत नागरी समस्यांचे समूळ उच्चाटन होण्याच्या दृष्टीकोनातून दर्जेदार असा कृती कार्यक्रम राबविणे अत्यावश्यक असून व ते परिणामकारक राबविल्यास अंदाजपत्रकातील विकास कामे पूर्णत्वास नेल्याचे समाधान नागरिकांच्या बरोबरच प्रशासनाला देखील मिळते. प्रशासन आपले कर्तव्य पार पाडीत असताना आदर्श नागरिक म्हणून प्रत्येक शहरवासियांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सहभाग, मग तो स्वच्छतेसाठी असो किंवा शहरास लाभलेली नैसर्गिक साधने वृक्षवल्ली यांची जोपासना, उपलब्ध पाण्याचा सुयोग्य वापर असो या सर्वांची मालकी व जबाबदारी आपलीच आहे ही धारणा आपल्या मनाशी बाळगली तर निश्चितच शहराचा चेहरामोहरा बदलण्यास वेळ लागत नाही.

या वर्षीचे सन २०२५-२०२६ चे माझे पहिले अंदाजपत्रक सादर करताना तो जास्तीत जास्त लोकाभिमुख व लोकोपयोगी होण्याच्या दृष्टीने स्वच्छता, आरोग्य, पायाभूत सुविधा या सर्व बाबी विचारात घेऊन अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. त्यामध्ये खालील बाबींना प्राधान्य दिलेले आहे आणि या प्राधान्य क्रमानुसार याचा निश्चितच उपयोग सर्वसामान्य जनतेस होईल, असा मला विश्वास आहे.

हे अंदाजपत्रक सादर करताना नागरिकांच्या स्थानिक पातळीवरील व मुख्य खात्यांशी संबंधीत तक्रारींचे निवारण करण्यासाठी उपआयुक्त परिमंडळ १ ते ५ क्षेत्रीय उप आयुक्त कार्यालयीन स्तरावर समिती गठीत करण्यात येईल. या समितीमध्ये विविध खात्यातील अभियंता संवर्गातील अधिकारी व क्षेत्रीय स्तरावरील प्रशासकीय अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली नागरिकांच्या तक्रारीचे निराकरण करण्यात येईल. पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या मनपा वसाहती विकसीत करण्यासाठी धोरण निश्चित करण्याबाबत लवकर निर्णय घेण्यात येणार आहे. यामध्ये खाजगी माध्यमातून किंवा बीओटी तत्वावर तेथील रहिवासी नागरिकांच्या संमतीने करण्याचे नियोजित आहे. या वसाहती विकसीत करताना कोणताही अनावश्यक आर्थिक भार महानगरपालिकेवर येणार नाही असे हे धोरण असणार आहे. पुणे महानगरपालिकेमध्ये आपत्कालीन कक्ष अस्तित्वात आहे. पुणे शहर आणि आपल्याला माहिती आहे की, शहरात आपत्ती येत असते आणि त्यासाठी असा सुसज्ज कक्षाचे आधुनिकीकरण करण्यासाठी व अधिक सक्षम करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. त्याच बरोबर पुणे शहरात जी वाढती लोकसंख्या आहे, शहराचा वाढता विस्तार आहे आणि या सर्व कार्यालयांच्या कार्यक्षेत्रामध्ये, स्वच्छता मोहिम या पूर्वी देखील सुरु केलेली आहे. मात्र या स्वच्छता मोहिमेमध्ये

विविध विभाग म्हणजे फक्त घनकचरा विभागाच्या व्यतिरिक्त पथ विभाग, विद्युत विभाग, मलनि:स्सारण व इतर संबंधीत विभागाचे अधिकारी यांचा समावेश करण्यात आलेला आहे. स्वच्छता मोहिमेमध्ये शाळांचाही सहभाग घेण्यात येत आहे व लोकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती, सहभागासाठी आवाहन करण्यात येत आहे.

महापालिकेची जी शहरी गरीब योजना आहे आणि त्यामध्ये त्या माध्यमातून देखीलआपल्या समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल वर्गासाठी आरोग्यविषयक सुविधा त्यांना शहरी गरीब योजने अंतर्गत देण्यात येतील. जे विविध साथ रोग येत आहेत आणि त्याकरिता मेट्रोपॉलिटन सर्व्हेलन्स युनीट (एम.एस.यु.) स्थापन करण्यात येईल केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार त्याकामी अद्ययावत प्रयोगशाळा, कुशल मनुष्यबळ या बाबी उपलब्ध करण्यात येणार आहेत.

डिजीटायझेशन-

(ब) इंटेलिजंट वर्क्स मॅनेजमेंट सिस्टीम (IWMS)- Intelligent Works Management System या संगणक प्रणालीचा वापर Engineering Project संबंधीत सर्व निविदा प्रक्रियांचे इस्टीमेट, कार्यादेश, बिले तयार करणे इ. प्रकारचे कामकाज ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत आहे.

(ड) रिव्हर फ्रंट डेव्हलपमेंट (River Front Development) - पुणे शहरातून वाहणाऱ्या मुळा, मुठा व मुठा-मुळा या नद्यांची एकुण लांबी ४४.४० किमी आहे. या नद्यांचा एकात्मिकरित्या विचार करुन नदीकाठ विकसनाच्या दृष्टीने नदी पुनरुज्जीवन प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे काम लवकरच कार्यान्वित होणार आहे.

एकता नगरी येथे कल्स्टर तयार करणे, पुणे पेठ वडगाव येथील एकतानगरी, विठ्ठलनगर, निंबजनगर येथील पुराने बाधित होणाऱ्या निळया पुररेषेमधील १३८३ सदनिका व ६७ दुकाने यांचे युडीसीपीआर चे कलम 14.8 अन्वये नागरी पुर्ननिर्माण योजने अंतर्गत लगतच्या हिंगणेखुर्द स.नं.१९ येथील मनपाच्या ताब्यात आलेल्या निळया पुररेषेवरील क्षेत्रावर पुर्नवसन करण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. त्यामुळे सद्यस्थितीतील इमारतींना पुराच धोका भविष्यामध्ये कायमस्वरुपी दूर होणार आहे. सदर बाबींसाठी या अंदाजपत्रकामध्ये प्रयत्न केला जाईल. पुणे महानगरपालिका क्षेत्रातील विविध स्मशानभूमी अपग्रेडेशन व सुशोभिकरण करणे – या स्मशान भूमींच्या माध्यमातून होणारे प्रदूषण कमी करण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जाईल. पुणे मनपा मालकीच्या जागाचा जागांचा अधिक किफायतशीरपणे उपयोग करून मनपाचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने तशी कार्यवाही करण्यात येईल. म्हणजे Optimal utilization of avaliable resources of the Corporation आणि त्या माध्यमातून देखील उत्पन्न वाढवून अनेक प्रकल्पाकरिता त्याचा वापर केला जाईल.

राष्ट्रीय नदी संवर्धन योजना - राष्ट्रीय नदी संवर्धन योजने अंतर्गत मुख्य मलवाहिन्या टाकणे. यामधील ९ मैलापाणी शुद्धीकरण केंद्रांचे व मलवाहिन्या टाकण्याचे काम प्रगतीपथावर आहे. अशा प्रकारे यामध्ये अनेक बाबींचे नियोजन आहे. हे अमृत महोत्सवी वर्ष आहे. यानिमित्ताने देखील विविध कार्यक्रम घेतले जातील. त्याच बरोबर वाहतूक नियोजन, शहरातील सुमारे ८० टक्के वाहतूक असलेले ३३ मुख्य रस्ते (Arterial Roads) निश्चित करण्यात आले असून त्यापैकी १५ रस्त्यांचे काम रिसर्फेसिंग, मिलिंग करणे, अद्यावत करणे याबद्दल देखील या अंदाजपत्रकात कार्यवाही समाविष्ट केली आहे.

या अर्थसंकल्पात विशेष धोरण म्हणून त्या धोरणात्मक निर्णयामध्ये कुठल्याही कराची वाढ या वर्षी केलेली नाही. तसेच समाविष्ट ३४ गावांसाठी ६२३ कोटी रू.पेक्षा जास्तीची तरतूद केली आहे. त्यांच्या मूलभूत सोयीकरिता या अंदाजपत्रकामध्ये ठेवली आहे. त्याच बरोबर या गावांची तसेच पुणे शहराची ग्रीव्हेन्स सर्व्हिसेस सिस्टीम वर सुध्दा जास्तीत जास्त भर दिला आहे. तसेच ट्राफिक सेल अद्यावत करीत आहोत. वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी कन्स्ल्टंट नेमून उपाययोजना करीत आहोत. वेगवेगळे रस्ते किंवा मालमत्ताचे संपादन करण्याकरिता शासनावर पूर्णत: अवलंबून न राहता यावर्षी भरीव अशी तरतूद केली आहे. कारण असे लक्षात आले आहे की, टी.डी.आर.च्या माध्यमातून खाजगी जमीनी संपादित केल्या जातात त्यामध्ये ते संबंधितांना फायदेशीर ठरत नाही. अशा लोकांसाठी निधीची तरतूद करण्याकरीता महापालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये २०० कोटी पेक्षा अधिक निधी भूसंपादनासाठी ठेवला आहे आणि याच बरोबर मिसिंग लिंक करिता हा भूसंपादनाचा निधी भूसंपादना व्यतिरिक्त रस्ते विभागाने रस्ते, मिसिंग लिंक करिता ३३ कोटी रू.ची तरतूद केली आहे. त्याच्या विकसनाकरीता १५ कोटी रू.ठेवले आहेत. कात्रज कोंढवा रस्तासाठी ७४ कोटी रू.ठेवले आहेत. त्याच बरोबर त्याच्या विकसनाकरीता देखील ५० कोटी रू.चा भरीव निधी ठेवला आहे. आता पर्यंत आपण फक्त टी.डी.आर.च्या माध्यमातूनच संपादनाचा विचार केलेला आहे. मात्र तत्कालीन परिस्थिती लक्षात घेवून आपण हा एवढा मोठा निधी भूसंपादनाकरीता ठेवला आहे.

**सन २०२५-२६ अंदाजपत्रकातील प्रस्तावित योजना/प्रकल्प**

आरोग्य विभागासाठी या वर्षी अमृत महोत्सव असल्याने यावर्षी अमृत महोत्सवी आरोग्य अभियान राबविले जाईल अंतर्गत झोपडपट्ट्यांमध्ये शिबिराचे आयोजन, दवाखाने आधुनिकीकरण, ताणतणाव नियोजन इ. साठी तरतूद करण्यात आलेली आहे. पुणे मनपा व खाजगी वैद्यकीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने कर्करोग निदाना करिता पेट स्कॅन प्रकल्प सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात कार्यान्वित होणार आहे. यामध्ये झोननिहाय प्रतिबंधात्मक उपाययोजनांसाठी तरतूद ठेवलेली आहे.

याच बरोबर शाळेच्या बाबतीत नॅशनल ऐज्युकेशन पॉलिसी राबविण्याच्या दृष्टीकोनातून त्याच बरोबर शहरातील महापालिकेला शाळेतील विद्यार्थ्यांना इतर माध्यमाच्या शाळेतून सिस्टर स्कूल कन्सर्न, हा देखील अत्याधुनिक असा प्रयोग राबविला जाईल.

महापालिकांच्या मंडईंचे अपग्रेडेशन करणार आहोत ते देखील केले जाईल. शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या शिक्षणाबरोबरच त्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून त्यामध्ये सी.सी.टी.व्ही.चे प्रयोजन त्यामध्ये केले आहे. ३४ समाविष्ट गावांची कनेक्टीव्हीटी आय.टी.च्या माध्यमातून केली जाईल. त्याच बरोबर शहरामध्ये विविध स्पर्धा परीक्षांसाठीचे जे विद्यार्थी याठिकाणी येत असतात. तर त्यांच्या प्रशिक्षण केंद्राकरीता देखील भरीव अशी तरतूद ठेवलेली आहे. जी सिटी लायब्ररी होत आहे तेथे देखील आम्ही प्रशिक्षण केंद्र स्थापित करीत आहोत. महिला बचत गटांसाठी सुपर स्टोअरची आखणी केली आहे. त्यांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना ग्राहक, बाजार मिळण्यासाठी ही योजना केली आहे. क्रीडा क्षेत्रात बॉक्सिंग ॲकेडमी, धर्नुविद्या प्रशिक्षण केंद्र, तसेच पंडित नेहरू स्टेडियम ग्राउंड अपग्रेडेशन आहे. ज्या ज्या ठिकाणी शासनाकडून मंहमंदवाडी भागात स्पोर्टस होण्यासाठी देखील तरतूद ठेवण्यात आली आहे. शहरामध्ये जे टाकावू पासून टिकावू शिल्प करून प्रत्येक झोननिहाय, शहराचे सुशोभिकरण करण्याकरिता देखील भरीव अशी तरतूद ठेवलेली आहे. याठिकाणी जी आर.के.लक्ष्मण गॅलरी आहे त्यांचेकडून मनपा शाळांतील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण मिळून लाभ व्हावा, यासाठी देखील भरीव तरतूद ठेवली आहे.

पुणे फेस्टीव्हल, हे अमृत महोत्सवी वर्ष आहे म्हणून त्याकरिता देखील भरीव तरतूद ठेवली आहे. क्रीडा स्पोटर्स कॉम्पलेक्सच्या ठिकाणी स्पोटर्स रिहॅब सेंटर्ससाठी सुध्दा तरतूद ठेवली आहे. जे लोकांच्या नागरीकांच्या दृष्टीकोनातून इमारत बांधकाम परवानग्या, वॉटर टॅक्स, मिळकत कर इ.साठी एकत्रितरित्या मोबाईल ॲपवर सुविधा निर्माण होणेसाठी तरतूद केली आहे. याठिकाणी असे हे एवढे धोरणात्मक निर्णय जवळ जवळ ४० निर्णय याठिकाणी घेतले आहे. सन २०२४–२५ मध्ये जी कामे हाती घेतली होती आणि त्याची देखील प्रगती यानिमित्ताने आपल्या समोर निदर्शनास आणून द्यायची आहे. समान पाणी पुरवठा योजनेमध्ये १४१ झोन मध्ये सन २०२४–२५ मध्ये एकूण पैकी ७२ झोनचे काम पूर्ण झालेले आहे. ८२ टाक्यांपैकी ६६ टाक्या आता पूर्ण झालेल्या आहेत. मात्र पुढच्या वर्षामध्ये सन २०२५–२६ मध्ये सर्व झोन, १४१ झोन हे पूर्ण करण्यावर भर दिला जाईल आणि सर्व टाक्या किमान ७९ टाक्या ज्या आहेत त्या कार्यरत होतील, असा प्रशासनाचा संकल्प आहे. पाणी पुरवठा बरोबरच मल:निसारण चे जे एस.टी.पी.चे प्लॉन्ट आहेत राष्ट्रीय नदी संवर्धन प्रकल्प अंतर्गत ११ प्लॉन्ट मधील बरीचशी कामे, म्हणजे हा प्रोजेक्ट पूर्ण होण्याकरीता कालावधी लागतो. मात्र सन २०२५–२६ मध्ये किमान ५ एस.टी.पी.पूर्णत: कार्यान्वित केले जातील.

सन २०२५–२६ मध्ये घनकचरा व्यवस्थापन विभागामध्ये जे इंटिग्रेटेड, एस.डब्ल्यु.एफ.जी सुरूवात केलेली आहे. लिगसी वेस्ट बॉयोमायनिंग प्रकल्प घेतला आहे. सन २०२५–२६ मध्ये ओल्या कचऱ्यापासून ब्रेकेटस तयार करणे. नवीन गावांमधून घनकचरा व्यवस्थापन बाबत ज्या तक्रारी आहेत त्यासाठी विशेष तरतूद केलेली आहे. ते देखील पूर्ण करण्याचा आमचा संकल्प राहिल. पुणे शहरामध्ये मुंबई, सोलापूर, अहमदनगर किंवा सातारा येथून जे येणारे आहेत त्यांच्यासाठी एक फाईव्ह स्टार टॉयलेटस किंवा ॲसपेशनल टॉयलेटस हे देखील या सन २०२५–२६ मध्ये केले जातील.

आरोग्य खाते बाबत सन २०२४–२५ मध्ये डॉयग्रेस्टीक सेंटर्स तसेच ॲनिमल बर्थ कंट्रोल सेंटर्स तसेच गुलियन बॅरेस सिन्ड्रोम बाबतची कारवाई केली आहे. यावर्षी आपण अमृत महोत्सवी पुणे आरोग्य अभियान हे आपण जाहिर करीत आहोत. त्याच बरोबर मेट्रोपॉलिटीन सर्व्हेन्लन्स युनिट आणि पेट स्कॅन याचे देखील सन २०२५–२६ मध्ये केले जाईल.

मेडिकल कॉलेजचा आता ४ था मजला झालेला आहे. त्याच बरोबर आता होस्टेलची व्यवस्था आणि मेडिकल कॉलेज अतिशय चांगल्या रितीने कार्यरत होण्याकरिता यासाठीची बांधकामे सन २०२५–२६ मध्ये पूर्ण केली जातील. टी.पी.स्कीम आणि ११ गावांचा डी.पी.टाउन्न प्लॅनिंग डिपार्टमेंट करीत आहे. २३ गावांचा पी.एम.आर.डी.ए.चा डी.पी.आहे.

या विभागाच्या मार्फत प्रधानमंत्री आवास योजना टप्पा –२ मध्ये जवळजवळ ४१७३ ही घरे महापालिकेतर्फे अतिशय माफक दरामध्ये जे पात्र लाभार्थी आहेत त्यांना देण्याचा आमचा प्रयत्न राहिल. वाहतूक नियोजनाच्या दृष्टीकोनातून घोरपडी गेट नं.६८, राजाराम चौक उड्डाणपूल, साधू वासवानी पूल असे अनेक प्रकल्प हाती घेतले आहेत. वाढती ट्राफिक लक्षात घेता सन २०२५–२६ मध्ये ग्रेड सेप्रेटरची कामे यामध्ये मुंढवा, खराडी बायपास, बिंधू माधव ठाकरे चौक ग्रेड सेप्रेटर इ.चा समावेश आहे. सन २०२४–२५ मध्ये पथ विभागामार्फत आंबील ओढ्यावरील १८ पूल पूर्ण केले आहेत. गणेशखिंड टप्पा–२ पूर्ण केला आहे. मुंबई पुणे रस्त्यांचे काम चांगल्या प्रकारे झालेले आहे. यामध्ये विमानतळ लगतचे रस्ते देखील केले आहेत. याच बरोबर या वर्षी सन २०२५–२६ मध्ये ज्या ३३ मिसिंग लिंक आहेत मघाशी मी सांगितल्याप्रमाणे भूसंपादनाकरिता महापालिकेच्या तीरीत निधी ठेवून त्या माध्यमातून देखील वाहतूक वर्दळ कमी करण्याच्या दृष्टीकोनातून कार्यवाही केली जाईल.

या शहराचे पी.एम.पी.एम.एल.च्या बसेस करीता जे अनुदान द्यायचे आहे. शेवटी शहराच्या नागरीकांच्या दृष्टीकोनातून जरी ती पी.एम.पी.एम.एल.ही कंपनी असेल मात्र ही जबाबदारी जी आहे की, ती महापालिका क्षेत्रातील नागरीकांच्यासाठी उपयुक्त आहे. त्यामुळे त्यांना ज्या बसेस घ्यायच्या त्याकरिता देखील याठिकाणी भरीव तरतूद ठेवलेली आहे.

सन २०२५–२६ मध्ये उद्यान विभागाचा जो बृहत आराखडा आहे तो पूर्ण करण्याच्या दृष्टीकोनातून कारवाई केली जाईल. जे विद्युत विभागामार्फत सन सन २०२४–२५ मध्ये स्व.विठ्ठलराव तुपे नाट्यगृह, मेडीकल कॉलेज, कलाग्राम, नगररोड क्षे.कार्यालय, बाणेर ट्रॅव्हल होस्टेल इ. या सगळया बाबी केल्या आहेत. सन २०२५–२६ मध्ये निर्जन स्थळावर दिवाबत्तीची सोय योग्य करणे त्याच बरोबर शाळांमधील विद्युत व्यवस्था व अग्शिमन यंत्रणा अद्यावत करणे, वाहन तळांवर सी.सी.टी.व्ही.बसविणे, स्मशान भूमींचे अपग्रेडेशन करणे ही सगळी कामे विद्युत विभागामार्फत करण्याचे नियोजन आहे.

या वर्षात आय.टी.विभागामार्फत ई–ऑफिस ची कार्यप्रणाली. आय.डब्ल्यु.एम.एस.जे आहेत ते प्रोजेक्ट करीता आहेत, इतर बांधकाम परवानगी करीता आहेत मात्र प्रशासकीय कामांकरिता ई–ऑफिस देखील अद्यावत करण्याचे नियोजन आहे. हरीटेज सेल मार्फत खूप प्रलंबित असलेले भिडेवाडा शाळेचे पुर्ननिर्माण सुरू केलेले आहे. या वर्षामध्ये दि.१ मे पर्यंत हे काम पूर्ण करण्याचा आमचा मानस राहील. त्याच बरोबर विश्रामबागवाडा, मंडई त्याच बरोबर तहसील कार्यालयातील उमाजी नाईक स्मारक, लहुजी वस्ताद साळवे स्मारक या सगळया स्मारकांकरिता देखील यावर्षी ठोस असे प्रयत्न करून ती कामे पूर्णत्वास नेण्याचा प्रयत्न राहील. याठिकाणी जे सामान्य प्रशासन विभागामार्फत महापालिकेमध्ये जी अनेक पदे रिक्त आहेत त्यांची भरतीची प्रक्रिया देखील राबविली जाईल. आपत्ती व्यवस्थापन कक्ष, यामध्ये इर्मजन्सी ऑपरेटींग सेंटर म्हणजे अद्यावत असा सेल महापालिका मुख्यालयामध्ये सुरू केला जाईल. समाज विकास विभाग यांच्या माध्यमातून दिव्यांगाकरिता थेरेपी सेंटर, स्कील डेव्हलपमेंट करिता टाटा यांच्या माध्यमातून इनक्युबेशन सेंटर प्रकल्प यास देखील गती देण्यात येईल. मालमता व्यवस्थापन दृष्टीकोनातून जे Optimal utilization of resources आहेत त्याला देखील गती देण्यात येईल. सन २०२५–२६ मध्ये अग्निशमनच्या बाबतीत, फायर फायटींगचे सेंटर्स, रेस्क्यु,अग्निशमन केंद्राचे बळकटीकरण करण्याचे नियोजन आहे. एकंदरीतच या अंदाजपत्रकामध्ये महत्वाचे निर्णय आपल्याला सांगितले आहेत. त्याच बरोबर सन २०२४–२५ आणि २०२५–२६ मध्ये काय अपेक्षित आहे ते देखील या माध्यमातून मी आपल्याला सांगितले आहे. जमा खर्चाच्या बाबतची सर्व माहिती बुकलेट मध्ये दिली आहे. साधारणत: सन २०२४–२५ मध्ये आपले जमा बजेट ११,६०१ कोटी रू. इतके होते आणि आतापर्यंत साधारणत: ६५०० कोटी रू.पर्यंत, ५५ टक्के एवढी जमा झालेली आहे. अपेक्षित ८४०० कोटी रू.पर्यंत आहेत त्या दृष्टीकोनातून नियोजन आहे. खर्चाच्या बाबतीत महसूली रेव्हेन्यु ६४०० कोटी रू.पैकी ४११३ कोटी रू.एवढा खर्च झालेला आहे म्हणजे ६४ टक्के खर्च झालेला आहे. भांडवली कॅपिटल मध्ये ५१८२ कोटी रू.पैकी १६५० कोटी रू.खर्च झालेला आहे त्यामध्ये ३२ टक्के खर्च झालेला आहे. आजपावेतो हा जो खर्च आहे तो ५० टक्यापेक्षा अधिक झालेला आहे आणि त्यामध्ये सन २०२४–२५ मध्ये साधारणत: ७० टक्के खर्च म्हणजे सध्या जी कामे चालू आहेत त्यांची या महिन्यामध्ये जे काही बिलिंग होईल, त्याप्रमाणे अपेक्षित असे आहे. ते साधारणत: ८१ टक्के एवढा रेव्हेन्यूचा खर्च होईल आणि ५४ टक्के एवढा यामध्ये खर्च होईल म्हणजे एकंदरीतच मागील बजेटच्या ७० टक्के एवढा खर्च आपण करू शकणार आहोत. या गतवर्षामध्ये विविध निवडणूका आणि त्या माध्यमातून त्याला थोडी गती मिळू शकली नाही. मात्र पुढील वर्षाच्या या बजेट मध्ये हे सगळे यामध्ये केले जाईल. एकंदरीतच मी हे जे सन २०२४–२५ संबंधी माहिती शेअर केली आहे. या वर्षीचे जे अंदाजपत्रक आहे. सन २०२५–२६ बजेट १२६१८.०९ कोटी रू.एवढे अंदाजपत्रक मी याठिकाणी सादर केलेले आहे. त्यापैकी जे ७०९३.२७ कोटी रू.एवढा रेव्हेन्यूचा खर्च राहिल आणि भांडवली कामांकरिता ५५२४.८० कोटी रू.खर्च राहिल. या भांडवली कामांमध्ये भवन विभागाकरीता, भवन विभागाच्या इमारती प्राथमिक शिक्षण, दुय्यम शिक्षण, आरोग्य विभाग, अग्निशमन पथक, खेळ, सांस्कृतिक केंद्रे, मंडई इ.करीता या वर्षीच्या अंदाजपत्रकामध्ये ४९०.१० कोटी रू.एवढी तरतूद या भांडवली कामांकरीता केलेली आहे.

घनकचरा व्यवस्थापन विभागाकरिता १४२.३५ कोटी रू.एवढी तरतूद ठेवलेली आहे. पथ सुधारणा विभागाकरीता ११२६.३० कोटी रू.एवढी तरतूद ठेवली आहे. वाहतूक नियंत्रण विभागाकरीता १५.६५ कोटी रू.एवढी तरतूद ठेवली आहे. विद्युत विभागाकरीता ८०.७२ कोटी रू.एवढी तरतूद ठेवली आहे. नदी सुधारणा करीता ३९६.६५ कोटी रू.एवढी तरतूद ठेवली आहे.स्ट्रॉम वॉटर ड्रेन प्रकल्पाकरीता ४२.९५ कोटी रू.एवढी तरतूद ठेवली आहे. शहर अभियंता कार्यालयाकडील प्रकल्पांसाठी ११३.५० कोटी रू.एवढी तरतूद ठेवली आहे. उद्याने, प्राणी संग्रहालये करीता ९१.६० कोटी रू.एवढी तरतूद ठेवली आहे. माहिती तंत्रज्ञान विभागाकरीता ५.२५ कोटी रू.एवढी तरतूद ठेवली आहे. १५ व्या वित्त आयोगातून पाणी आणि वायू प्रदुषण नियंत्रणाकरीता २५४.५५कोटी रू.एवढी तरतूद ठेवली आहे. १५ व्या वित्त आयोगातंर्गत आपत्ती व्यवस्थापन करीता १५८.२६ कोटी रू.एवढी तरतूद ठेवली आहे. भूमी संपादनाकरीता ५० कोटी रू.एवढी तरतूद ठेवली आहे. झोपडपट्टी निर्मूलन व पुंनवसन निधी करीता १४.१५ कोटी रू.एवढी तरतूद ठेवली आहे. मागासवर्गीय कल्याणकारी योजना निधी, महिला बाल कल्याण योजना निधी, युवक कल्याणकारी योजना निधी, दिव्यांग कल्याणकारी योजना निधी अशी एकूण तरतूद ९५.६३ कोटी रू.एवढी तरतूद ठेवली आहे. यंत्रसामुग्री करीता ६६.४५ कोटी रू.एवढी तरतूद ठेवली आहे. वृक्ष संवर्धन करीता आणि संवर्धन प्राधिकारी करीता ७.५० कोटी रू.एवढी तरतूद ठेवली आहे. अमृत आणि जे.एन.यु.आर.एम.करीता २९१.५० कोटी रू.एवढी तरतूद ठेवली आहे. सार्वजनिक वाहतूक सुधारणा व विशेष प्रकल्पांकरीता २६४ कोटी रू.एवढी तरतूद ठेवली आहे. प्रधानमंत्री आवास योजनेकरीता ७६.५० कोटी रू.एवढी तरतूद ठेवली आहे. नागरीकांचा सहभाग, क्षेत्रिय कार्यालयांमार्फत करावयाची कामेसाठी २१.९९ कोटी रू.एवढी तरतूद अंदाजपत्रक 'अ' मध्ये ठेवली आहे आणि एकंदरीत ही जी तरतूद आहे ३८०५.६० कोटी रू.एवढी तरतूद या अंदाजपत्रकामध्ये 'क' अंदाजपत्रकाकरिता ठेवली आहे.

अंदाजपत्रक 'क' पाणी पुरवठा मल:निसारण याकरीताचे आहे. पाणी पुरवठा करीता ओ ॲण्ड एम करीता ११९.३५ कोटी रू. एवढी तरतूद ठेवली आहे. मल:निसारण विभागाकरीता ४९३.७७ कोटी रू.एवढी तरतूद ठेवली आहे. पाणी पुरवठा प्रकल्पाकरिता ५४२ कोटी रू.एवढी तरतूद ठेवली आहे. मल:निसारण प्रकल्पाकरिता ५५३ कोटी रू.एवढी तरतूद ठेवली आहे आणि क्षेत्रिय कार्यालयाने करावयाची पाणी पुरवठ्याची कामे त्याकरिता ११.०८ कोटी रू. एवढी तरतूद ठेवली आहे. अशा रितीने 'क' पत्रकामध्ये १७१९.२० कोटी रू.एवढी तरतूद या अंदाजपत्रकामध्ये ठेवलेली आहे. एकूण जे अंदाजपत्रक 'क' आणि 'अ' याची बेरीज ५५२४.८० कोटी रू. असे हे भांडवली कामांकरीता तरतूद केली आहे. उर्वरित सविस्तर माहिती माझ्या निवेदनात दिलेली आहे. अशा दृष्टीकोनातून आजच्या या स्थायी समिती मध्ये एकंदरीत गेल्या वर्षाचे जमा आणि खर्चाची माहिती दिलेली आहे. तसेच मागील वर्षीची जी महत्वाची कामे घेतली आहेत त्याबद्दल माहिती दिली. सन २०२५–२६ मध्ये जी महत्वाची कामे हाती घेणार आहोत त्याची माहिती दिली. सन २०२५–२६ या वर्षाकरीता जे धोरणात्मक निर्णय घेतलेले आहेत. ज्यामध्ये नागरीकांना केंद्रस्थानी मानून ज्या काही सुविधा द्यायच्या आहेत त्या दृष्टीकोनातून ही सगळी कार्यवाही, या अंदाजपत्रकामध्ये

समाविष्ट केलेली आहे. हे अंदाजपत्रक सादर करताना, एक सकारात्मक दृष्टीकोन ठेवून ज्या ज्या काही शासनाच्या कल्याणकारी योजना राबवायच्या आहेत. अंदाजपत्रकात विकास कामांचे जे उद्दिष्ट ठेवले आहे. त्याकरीता सर्व प्रशासन बांधील राहिल. अंदाजपत्रक सादर करताना सर्व माजी सभासद, माजी पदाधिकारी, अधिकारी कर्मचारी वर्ग, कामगार संघटना, स्वंयसेवी संस्था, सर्व प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी त्याचे बरोबर सर्व जे राज्य स्तरावरील सभासद, पदाधिकारी आहेत त्यांचे मी याठिकाणी आभार व्यक्त करतो. केंद्रातील आणि राज्यातील जे मा.मंत्री महोदय आहेत, मा.संसद सदस्य आहेत, मा.राज्यसभा सदस्य आहेत, मा.विधानसभा आणि मा.विधान परिषद सभासद आहेत, शासनाच्या विविध महामंडळावरील जे सदस्य आहेत त्या सर्वांचे मी मनापासून आभार मानतो आणि प्रस्तावित या अर्थसंकल्पास आणि यामध्ये मूर्त स्वरूप देताना या सर्व घटकांचे मला निश्चित सहकार्य लाभेल, या विश्वासासह मी सन २०२५–२६ चे अंदाजपत्रक आज मंगळवार दि.४ मार्च २०२५ रोजी मी स्थायी समितीला सादर करीत आहे. धन्यवाद..

**(ब) दृष्टीक्षेपात सन २०२५-२६ आर्थिक वर्षासाठी जमाखर्चाचा अंदाज-**

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या जमाखर्चाचा अंदाज पुढीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

**(आकडे रुपये कोटीत)**

| **जमा बाजू** | | **खर्च बाजू** | |
|---|---|---|---|
| आरंभीची शिल्लक | ०.०२ | सेवकवर्ग खर्च | ३६४२.०० |
| स्थानिक संस्था कर | ५४५.३२ | वीज खर्च व दुरूस्ती | ४१५.२६ |
| वस्तू आणि सेवा कर (GST) | २७०१.७७ | पाणी खर्च | १७२.६६ |
| मिळकतकर | २८४७.२३ | कर्ज परतफेड, व्याज व घसारा | ८५.७२ |
| विकास शुल्क | २८९९.९९ | औषधे, पेट्रोल / डिझेल | २६६.७७ |
| पाणीपट्टी | ६१८.७२ | देखभाल दुरूस्ती व इतर खर्च | २३४५.१५ |
| शासकीय अनुदान | १६३३.४४ | वॉर्डस्तरीय | ३४.८० |
| इतर जमा | ९७५.५० | क्षेत्रीय कार्यालयाने करावयाची कामे (नॉन प्लॅन) | १३०.९१ |
| कर्ज / कर्जरोखे | ३००.०० | भांडवली विकासाची कामे | ५२३३.३० |
| प्रधानमंत्री आवास योजना | ९६.१० | अमृत व स्मार्ट सिटी अभियान | २९१.५० |
| | | वर्षाअखेरची शिल्लक | ०.०२ |
| एकूण | १२६१८.०९ | एकूण | १२६१८.०९ |

(यावेळी अंदाजपत्रक पुस्तकाचे प्रकाशन करून मा.स्थायी समितीस सादर करण्यात आले.)

**मा.प्रशासक तथा आयुक्त :** मी आता महा.आयुक्त म्हणून याठिकाणी महापालिका अधिनियम कलम ९५ नुसार जे अंदाजपत्रक तयार करायचे आहे आणि त्यामध्ये मा.आयुक्त यांचेकडून उत्पन्न व खर्चाचा अंदाज तो तयार करून मी या कलम ९५ नुसार स्थायी समितीला सादर केला आहे.

आता मी महापालिका अधिनियमाच्या कलम ९६ नुसार जे महा.आयुक्त यांनी अर्थसंकल्पीय अंदाज तयार केला आहे त्यावर आता प्रशासक म्हणून कलम ९६ नुसार ही जबाबदारी माझ्यावर दिलेली आहे आणि त्याकरीता स्थायी समितीचे कलम ९६ नुसार अर्थसंकल्पीय अंदाज आहे तो मी याठिकाणी सादर करीत आहे.

कलम ९६ नुसार जे महा.आयुक्त यांनी अर्थसंकल्पीय अंदाज तयार केला आहे त्यावर आता स्थायी समिती अध्यक्ष तथा प्रशासक या नात्याने या अंदाजपत्रकाला मी मंजूरी देत आहे आणि मी तो मान्य करीत आहे.

**नगरसचिव :** विषय क्र.१८५२ मान्य करण्यात आला.

**निर्णय :– सदर विषय मान्य करण्यात आला.**

**अशा पध्दतीने सभेचे कामकाज होऊन सभा समाप्त झाली.**

**स्वाक्षरी /–xxx**
**(योगिता भोसले)**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**वृत्तांत मंजूर.**

**स्वाक्षरी /–xxx**
**( डॉ.राजेन्द्र ब. भोसले )**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**पुणे महानगरपालिका.**